तरुण भारत मंगळवार, १ सप्टेंबर २०१५

# 'श्रावणपंखात भारलेले श्वास झाले ओले'

प्रतिनिधी
दोडामार्ग

'श्रावणपंखात भारलेले श्वास झाले ओले,
ऋतुकुस बदलता मन आभाळ जाहलेले
निळ्या नभाच्या निळाईत, निर्झर वेडावलेले'

श्रावण महिन्यात सारी धरणी हिरवागार शालू पांघरुन नवं रुप धारण करते, निसर्गात अनेक बदल होत असतात. या प्रसन्न व मांगल्यपूर्ण चैतन्यमय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात मराठी भाषा व वाङ्‌मय मंडळाच्या उद्‌घाटनाचे औचित्य साधून 'श्रावणोत्सव' हा पावसाळी कवितांवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला गोव्यातील कवयित्री व लोक साहित्याच्या अभ्यासक पौर्णिमा केरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी 'नभ मेघांनी भरले. झाड न झाड ओथंबूनी गेले, श्रावणरंगी धून बरसली' यांचे सादरीकरण केले. यावेळी त्यांनी कवितेचे तंत्र आणि मानवी जीवनातील तिचे महत्व सांगितले.

**दोडामार्ग कॉलेजमध्ये रंगला काव्य महोत्सव**

मनातील उत्स्फूर्त भावनांचा अविष्कार म्हणजे कविता. जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाने श्रवण, मनन, चिंतन, आणि मंथन यांचा अवलंब केला पाहिजे. आपल्यातील क्षमता ओळखून त्या विकसित कराव्यात, असे प्रतिपादन केरकर यांनी केले. विद्यार्थ्यांच्या कला–गुणांना वाव देण्यासाठी मराठी भाषा व वाङ्‌मय मंडळातर्फे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. याचे औचित्य साधून 'सृजन भित्तीपत्रक व पोस्टर मेकिंग' स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या काव्यवाचन गायन कार्यक्रम झाला. यावेळी पावसांवर कवितांचे सादरीकरण करण्यात आले. उपस्थितांनी गीतांचा आस्वाद घेतला. प्रा. दिलीप बर्वे यांनी कार्यक्रमाचे महत्व विषद केले. यावेळी व्यासपीठावर प्रा. प्रशांत ढेपे, प्रा. एम.टी बेग, प्रा. सोनम देसाई उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती फाटक तर आभार एस. एस. पाडगावकर यांनी मानले.



**दोडामार्ग : श्रावणोत्सवात बोलतांना गोव्याच्या लेखिका पौर्णिमा केरकर.**